'एनसीएल'तर्फे ६ महिन्यांची कार्यशाळा

# रसायनशास्त्राशी मैत्रीसाठी अनोखी कार्यशाळा

**पुणे** | दि. २२ (प्रतिनिधी)

**शाळेतील** विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र म्हणजे नेमके काय... त्याचा वापर काय असतो... ते कोठे वापरले जाते... हे सांगण्यासाठी आणि रसायनशास्त्राशी मैत्री करण्यासाठी एनसीएल, आयआयएसईआर व ईएसजी यांच्या वतीने ६ महिन्यांच्या खास कार्यशाळेचे आयोजन केले आहे. या कार्यशाळेत विद्यार्थी थेट शास्त्रज्ञांशी संवाद साधणार असून, एनसीएलच्या प्रयोगशाळेत रासायनिक प्रयोगही करणार आहेत.

यंदाच्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्षाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या मनात या विषयाबद्दल आस्था निर्माण करण्यासाठी आणि त्याचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अॅन्ड रिसर्च (आयआयएसईआर) आणि एक्झीटिंग सायन्स ग्रुप (ईएसजी) यांनी पुढकार घेतला आहे. यासाठी त्यांनी शहरातील विविध शाळांमधील आठवी व नववी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २ जुलैपासून २ जानेवारीपर्यंत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

दर शनिवारी पाच तास चालणाऱ्या या कार्यशाळेत सुरुवातीला ४५ मिनिटे शास्त्रज्ञ रसायनशास्त्राबाबत पूर्ण माहिती, त्याचा दैनंदिन जीवनातील उपयोग याबाबत देणार आहेत. यानंतर दोन तास या शास्त्रज्ञांशी गप्पा, चर्चा करण्यासाठी विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे. पुढील दोन तास प्रत्यक्ष प्रयोगशाळेत रासायनिक प्रक्रिया करण्यासाठी देण्यात येणार आहेत.

कार्यशाळेची माहिती आणि उद्देश सर्वांपर्यंत पोहोचावा यासाठी संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे उद्घाटन आज एनसीएलचे संचालक डॉ. सौरभ पाल, आयआयएसईआरचे संचालक डॉ. के. एन. गणेश यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रकल्पाबाबत डॉ. पाल म्हणाले, आपल्या दैनंदिन जीवनात आपण रोज रसायनशास्त्राला सामोरे जात असतो. आपल्या जीवनातील ९९ टक्के भाग हा या शास्त्रावरच आधारित असतो. यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. पण याची अनेकांना महितीच नाही. यामुळे या शास्त्राकडे खूपच कमी विद्यार्थी वळतात. त्यामुळे संशोधनात मोठी घट होत आहे. हे ओळखून शाळांमधील विद्यार्थ्यांना या शास्त्राची ओळख करून देण्यासाठी त्यातील भविष्याच्या दिशा दाखविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

### कसे जाल कार्यशाळेला...

रसायनशास्त्र कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी त्यांच्या शाळांना एनसीएलशी संपर्क करावा लागणार आहे. www.excitingscience.org/IYC2011या संकेतस्थळावर कार्यशाळेची पूर्ण माहिती देण्यात आली आहे. तेथेच एक अर्जही देण्यात आला आहे, जो शाळेने भरून पाठवायचा आहे. यानंतर एनसीएलच्या वतीने संबंधित शाळेला दिनांक आणि वेळ कळविली जाणार आहे. एका शाळेतून जास्तीत जास्त ३० विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.